www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No. **C**

प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

# Paper-II

# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

2. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

Seat No. ☐☐☐☐☐☐☐

(In figures as in Admit Card)

Seat No. ..........................................

(In words)

OMR Sheet No. ☐☐☐☐☐☐☐

(To be filled by the Candidate)

## JUN - 01225


**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **20** Number of Questions in this Booklet : **100**

### Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.

   **Example :** where (B) is the correct response.


   Following wrong methods should not be used as they are not recognised by scanning machine in digitized assessment. Candidate using such method will be responsible for their loss.

   
   
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   - (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.

   **उदा.** : जर (B) हे योग्य उत्तर असेल तर.

   खालील चुकीच्या पद्धती वापरू नये, कारण डिजिटाइज्ड (Digitized) मूल्यांकनात स्कॅनिंग मशीन त्यांना ओळखत नाही. त्या पद्धती वापरून नुकसान झाल्यास त्यास विद्यार्थीच जबाबदार असतील.

   
   
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**JUN - 01225/II—C**

# Marathi
## Paper II
## मराठी
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. वाङ्मयेतिहासाच्या लेखनामध्ये काटेकोरपणे कालानुक्रम पाळण्याच्या निर्णयानुसार 'विवेकसिंधू'ची भाषा उत्तरकालीन असल्याचे मानून 'लीळाचरित्र'ला पहिलेपणाचा मान देणारे वाङ्मयेतिहासकार कोण आहेत ?

   (A) रा. श्री. जोग

   (B) शं. गो. तुळपुळे

   (C) अ. ना. देशपांडे

   (D) रा. शं. वाळिंबे

2. मराठी वाक्यरचनेतील शैथिल्य आणि अनियमितपणा काढून टाकून मराठी भाषेला मेजर कँडीने बंदिस्तपणा आणला, आणि मराठी लेखनात विरामचिन्हे वापरण्याची पद्धती विल्यम कॅरेने सुरू केली.

   (A) संपूर्ण विधान बरोबर

   (B) संपूर्ण विधान चूक

   (C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

   (D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

3. 'कथाकल्पतरू' या मूळ संस्कृत ग्रंथावरून त्याच नावाचा मराठी पौराणिक ग्रंथ कोणी रचला ?

   (A) कृष्ण याज्ञवल्की

   (B) निरंजन माधव

   (C) आनंदतनय

   (D) अवचितसुतकाशी

4. रागदारीवर लावण्या रचणारा मराठी शाहीर कोण आहे ?

   (A) अनंतफंदी

   (B) प्रभाकर

   (C) रामजोशी

   (D) होनाजी

5. 1842 मध्ये शिळाछापावर अकारक्रमाने छापलेल्या म्हणींच्या संग्रहाचे नाव काय ?

   (A) व्यवहार दर्पण

   (B) म्हणी रत्नमाला

   (C) फुर्डुक वही

   (D) मराठी प्रचारांतील म्हणी

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



6. म. जोतिबा फुले यांचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ कधी प्रकाशित झाला ?

(A) 1873

(B) 1883

(C) 1885

(D) 1891

7. वाङ्मयीन नियतकालिके आणि संपादक यांच्या योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (*a*) | प्रतिभा | (1) | वि. स. खांडेकर, खं. सा. दौंडकर |
| (*b*) | पारिजात | (2) | ना. सी. फडके |
| (*c*) | रत्नाकर | (3) | ह. वि. मोटे |
| (*d*) | ज्योत्स्ना | (4) | र. ज. सामंत |

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (1) | (4) | (3) |
| (B) | (1) | (3) | (2) | (4) |
| (C) | (4) | (2) | (3) | (1) |
| (D) | (3) | (4) | (2) | (1) |

8. पुढीलपैकी गीता साने यांची कादंबरी कोणती आहे ?

(A) अग्नियान

(B) निखळलेली हिरकणी

(C) विझती ज्योत

(D) काटेरी मार्ग

9. 'बारा बलुतेदार' हा कथासंग्रह कोणाचा आहे ?

(A) श्री. म. माटे

(B) व्यंकटेश माडगूळकर

(C) शंकरराव खरात

(D) शंकर पाटील

10. पुढीलपैकी कोणता ग्रंथ द. ग. गोडसे यांचा नाही ?

(A) नीरक्षीर

(B) शक्तिसौष्ठव

(C) मातावळ

(D) गतिमानी

11. दलित साहित्याचे नामाभिधान 'फुले-आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य' असे कोणी केले आहे ?

(A) दया पवार

(B) यशवंत मनोहर

(C) राजा ढाले

(D) बाबुराव बागूल

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



12. 1975 साली हे 'आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष' हा धागा पकडून 'स्त्रीमुक्ती चळवळ' हे पुस्तक कोणी प्रसिद्ध केले आहे ?
    - (A) शारदा देशमुख
    - (B) विद्युत भागवत
    - (C) कुमुद करकरे
    - (D) गौरी देशपांडे

13. आधुनिक मराठी जैन साहित्याचा प्रवर्तक पुढीलपैकी कोणास मानले जाते ?
    - (A) बा. भु. पाटील
    - (B) धनंजय शहा
    - (C) हिराचंद्र नेमचंद दोशी
    - (D) वालचंद नानचंद शहा

14. 'लघुपत्रिकांची चळवळ ही एक देशी चळवळ होती आणि तिच्या उगमाचे स्रोत विदेशी चळवळीत किंवा एतद्देशीय हंग्री जनरेशनसारख्या चळवळीत शोधणे हास्यास्पद आहे.' असे विधान कोणी केले आहे ?
    - (A) रा. ग. जाधव
    - (B) चंद्रकांत पाटील
    - (C) आनंद पाटील
    - (D) मे. पु. रेगे

15. 'जनहितैषी व्यक्तित्त्वाने शब्दबद्ध केलेली जीवनानुभूती म्हणजे 'जनसाहित्य होय!' अशी व्याख्या कोणी केली आहे ?
    - (A) सुभाष सावरकर
    - (B) र. बा. मंचरकर
    - (C) जनार्दन वाघमारे
    - (D) सुदाम सावरकर

16. मुस्लिम मराठी साहित्याच्या चळवळीसाठी सुरू केलेल्या 'मुस्लिम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना कोणी केली ?
    - (A) हमीद दलवाई
    - (B) यू. म. पठाण
    - (C) अलीम वकील
    - (D) सय्यद अमीन

17. आदिवासी श्रमिक चळवळीतून घडलेला कवी म्हणून पुढीलपैकी कोणाचा उल्लेख केला जातो ?
    - (A) भुजंग मेश्राम
    - (B) उत्तमराव धोंडगे
    - (C) वाहरू सोनावणे
    - (D) विनायक तुमराम

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



18. 'बायजा' या नियतकालिकाचे संपादक म्हणून पुढीलपैकी कोणी काम पाहिले ?
(A) शांताबाई किर्लोस्कर
(B) सौदामिनी राव
(C) विद्युत भागवत
(D) सुमती लांडे

19. ''जनसाहित्य म्हणजे जननिष्ठ जाणिवेने जीवनवास्तवाचा घेतलेला कलात्मक वेध होय!'' असे कोणी म्हटले आहे ?
(A) सुदाम सावरकर
(B) सुधाकर गायधनी
(C) सुभाष सावरकर
(D) रा. गो. चवरे

20. ''तुम्हांसी शरण बहुत मागे आले।
तयांचे साहिले अपराध।
तैसा मी पामर यातिहीन देवा
माझा तो कुढावा करा तुम्ही॥''
हा अभंग पुढीलपैकी कोणत्या संताचा आहे ?
(A) संत निर्मला
(B) संत जनाबाई
(C) संत सोयराबाई
(D) संत चोखोबा

21. नजूबाई गावित यांची 'तृष्णा' ही पहिली कादंबरी असून, तिचे कथानक 'ठाकर' आणि 'कोळी महादेव' जमातीतील पात्रांभोवती गुंफलेले आहे.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

22. कला म्हणजे जीवनाचे नकारात्मक ज्ञान आहे, हे सांगून साहित्य आणि वास्तवाचे संबंध स्पष्ट करताना 'दूरत्वाची' कल्पना पुढीलपैकी कोणी मांडली आहे ?
(A) कार्ल मार्क्स
(B) थिडनोडोर अडोर्नो
(C) एंगल्स
(D) कार्ल लुईस

23. समर खडस यांनी पुढीलपैकी कोणता कथासंग्रह लिहिला आहे ?
(A) श्रीलिपी
(B) बकऱ्याची बॉडी
(C) आयुष्याची छोटी गोष्ट
(D) ओल हरवलेली माती

Prepp
Your Personal Exams Guide



24. 'माकडांनी माणसांशी केलेला संवाद' हे सूत्र पुढीलपैकी कोणत्या काव्यसंग्रहात पाहवयास मिळते ?

(A) सलोखा

(B) फकीरवेळ

(C) अंतर्यामी

(D) अंतर्वेध

25. नीलिमा गुंडी यांचा पुढीलपैकी कोणता बालकाव्य संग्रह नाही ?

(A) आभाळीचा फळा

(B) आभाळाचे पंख

(C) कानामात्रा

(D) रंगांचा थवा

26. 'मंगळावर स्वारी' ही अंतराळ कथा कुणी लिहिली आहे ?

(A) द. पां. खांबेटे

(B) भा. रा. भागवत

(C) नारायण धारप

(D) द. चिं. सोमण

27. 'अक्षरवैदर्भी' हे जनसाहित्याला वाहिलेले मासिक कधी सुरू झाले ?

(A) 1984

(B) 1980

(C) 1985

(D) 1988

28. "कमळात भृंग जैसा कोंडून अंध होतो
मकरंद स्वाद घेता पुरता भूलून जातो"
ही भाववाही रचना कुणाची आहे ?

(A) अ. नि. हुपरे

(B) शीला शहा

(C) विजयकुमार बेळके

(D) गीत बाहुबली

29. 'अनुभव' या वाङ्मयीन संकल्पनेत एखाद्या साहित्यकृतीतील घटना प्रसंग, पात्रे, वातावरण, मानवी भावना, कल्पना इ. घटक अभिप्रेत असतात, तर 'आशय या वाङ्मयीन संकल्पनेत अनुभवा'चे चिंतनोत्तर काळातील बुद्धिगम्य, तर्काधिष्ठित असे सारतत्त्व अभिप्रेत असते.

(A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(B) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(C) संपूर्ण विधान चूक

(D) संपूर्ण विधान बरोबर

30. 'सुमति-अभंग' या भावकाव्याचा आविष्कार पुढीलपैकी कोणी केला आहे ?

(A) शरयू शहा

(B) चतुरा साहुजी

(C) गोविंद कटके

(D) लीला शहा

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



31. पुढीलपैकी रुय्यकाचा ग्रंथ कोणता ?

(A) साहित्यमीमांसा

(B) अलंकाररत्नाकर

(C) काव्यादर्श

(D) काव्यालंकारसारसंग्रह

32. 'प्रतिभा' ही 'नैसर्गिकी' असली तरी, ती 'श्रुत' व 'अभियोग' यांनीही साध्य करता येऊ शकते, असे कोणी म्हटले आहे ?

(A) रुद्रट

(B) हेमचंद्र

(C) अभिनवगुप्त

(D) दण्डी

33. कवीच्या वैशिष्ट्यपूर्ण शब्दार्थ योजनेला 'प्रतिभासनिबंधन' असे कोणी म्हटले आहे ?

(A) जगन्नाथ

(B) वामन

(C) राजशेखर

(D) क्षेमेन्द्र

34. नाट्यांत रसामुळे भावांची निष्पत्ती आहे की भावांमुळे रसांची निष्पत्ती आहे ? असा रसविषयक प्रश्न कोणत्या मीमांसकाने मांडला आहे ?

(A) श्रीशंकुक

(B) भरत

(C) अभिनवगुप्त

(D) भट्टतौत

35. वस्तुध्वनी आणि अलंकारध्वनी हे दोन्ही प्रकार लौकिक आहेत, कारण वस्तुध्वनी आणि अलंकारध्वनीतील भाव शब्दांनी वाच्य होऊ शकतो.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

36. 'सह्याद्रिवर्णन' कार खळोव्यासांनी पुढीलपैकी कोणती लिपी निर्माण केली आहे ?

(A) सुंदरी

(B) सुभद्रा

(C) सकळा (सकळी)

(D) वज्र

37. 'ज्ञानेश्वरीत कर्म आहे पण कर्माची कटकट नाही. भक्ती आहे पण ती भोळीभाबडी नाही. ज्ञान आहे पण केवळ शब्दज्ञान नाही.' हे विधान कोणी केले आहे ?

(A) ह. श्री. शेणोलीकर

(B) ल. रा. पांगारकर

(C) रा. द. रानडे

(D) शं. वा. दांडेकर

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



38. 'सूफी संप्रदाय : तत्त्वज्ञान आणि कार्य' या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) सेतू माधवराव पगडी

(B) यू. म. पठाण

(C) अलिम वकील

(D) र. रा. गोसावी

39. श्रीकृष्णभक्तिपर पाच प्रकरणे असलेली 'पंचसुधा' ही निर्मिती कोणाची ?

(A) नागेश

(B) सामराज

(C) विठ्ठल बीडकर

(D) वामन पंडित

40. पुढील शाहिरांचा त्यांच्या जन्मकाळानुसार क्रम ओळखा.

(A) अनंतफंदी, रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ

(B) रामजोशी, अनंतफंदी, प्रभाकर, सगनभाऊ

(C) सगनभाऊ, प्रभाकर, अनंतफंदी, रामजोशी

(D) प्रभाकर, सगनभाऊ, रामजोशी, अनंतफंदी

41. 'साहित्यिक क्षमता' ही संकल्पना पुढीलपैकी कोणत्या अभ्यासकाने मांडली आहे ?

(A) नॉर्थ्रॉप फ्राय

(B) जोनाथन कलर

(C) हर्बर्ट रीड

(D) ॲरिस्टॉटल

42. 'पायाभूत करार' ही संकल्पना साहित्यप्रकारांचा निकष म्हणून कोणी स्पष्ट केली आहे ?

(A) जोनाथन क्यूलर

(B) तोदोरोव्ह

(C) नॉर्थ्रॉप फ्राय

(D) क्रोचे

43. कोणत्या प्रकारच्या समीक्षेमध्ये नाममात्रतावादी भूमिका गृहीत धरलेली आहे ?

(A) आस्वादक

(B) चरित्रात्मक

(C) आदिबंधात्मक

(D) मानसशास्त्रीय

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



44. 'मराठी लावणी वाङ्मय' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?
   (A) रा. चिं. ढेरे
   (B) प्रभाकर मांडे
   (C) गंगाधर मोरजे
   (D) म. ना. अदवंत

45. ऋषींनी रचलेल्या महाकाव्यांना कोणत्या संज्ञेने संबोधले जाते ?
   (A) विदग्ध
   (B) भव्योदात्त
   (C) शोकात्म
   (D) आर्ष

46. ऐतिहासिक दृष्टीने मराठी कथेचा आढावा घेणारा ग्रंथ कोणता आहे ?
   (A) मराठी कथा : उगम आणि विकास
   (B) लघुकथा लेखन : मंत्र आणि तंत्र
   (C) मराठी कथा : रूप आणि परिसर
   (D) कथा : संकल्पना आणि समीक्षा

47. स्वप्नातील संक्षेप प्रक्रिया व स्थानान्तर या दोन संकल्पनांचा उलगडा कोणी केला आहे ?
   (A) कार्ल युंग
   (B) सिग्मंड फ्रॉइड
   (C) एफ. आर. लेविस
   (D) सुसान लँगर

48. 'तुकोबांच्या अभंगांची शैलीमीमांसा' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?
   (A) अशोक केळकर
   (B) रमेश धोंगडे
   (C) भालचंद्र नेमाडे
   (D) दिलीप धोंडगे

49. असंगत नाटकाचे मराठीतील उदाहरण कोणते आहे ?
   (A) गिधाडे
   (B) महानिर्वाण
   (C) सूर्य पाहिलेला माणूस
   (D) वेड्याचं घर उन्हात

www.prepp.in



50. 'पोवाडा हे दृश्यकाव्य आहे' असे मत कोणी मांडले आहे ?

(A) वि. का. राजवाडे

(B) गंगाधर मोरजे

(C) प्रभाकर मांडे

(D) प्र. न. जोशी

51. बाल निवेदकाच्या प्रथमपुरुषी निवेदनाचा प्रभावी उपयोग शंकर पाटील यांच्या पुढीलपैकी कोणत्या कथेत दिसतो ?

(A) सूड

(B) शारी

(C) भान

(D) आफत

52. 'विद्या आणि पुरुषू माहाराष्ट्री असे' असे 'लीळाचरित्रा'त कोणी म्हटले आहे ?

(A) अनंतमूनि

(B) महादेओमूनि

(C) महदाइसा

(D) चांगदेओ राउळ

53. 'शोभायात्रा' या नाटकातील शोभायात्रेत सुभाषबाबूंची भूमिका कोणत्या पात्राने साकारली आहे ?

(A) बाबू

(B) प्राध्यापक

(C) सबनीस

(D) जाधव

54. 'जीवाचिया जीवा प्रेमभावाचिया भावा। तुजवांचुनि केशवा अनुनावडे ॥१॥' ही गॉळण कोणाची आहे ?

(A) संत ज्ञानदेव

(B) संत नामदेव

(C) संत भानुदास

(D) संत निळोबा

55. 'आनंदओवरी' मध्ये दुकान सांभाळायला कोणी नकार दिला ?

(A) सावजी

(B) आई

(C) मंबाजी

(D) गोंद्या

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



56. 'सभासदाच्या बखरीमध्ये कृष्णाजी अनंत सभासद याने पुढीलपैकी कोणत्या घटनेचा कालशक दिलेला आहे ?

(A) अफजलखान वध

(B) शिवाजी महाराजांची भागानगरास भेट

(C) शिवराज्याभिषेक

(D) शिवाजी महाराज व व्यंकोजी भेट

57. 'हरियाने घराला एक पोटमाळा केला होता. तिथे जुनी हत्यारे, बिन उपयोगाच्या लाकडाच्या फळ्या व अन्य भंगाराचे सामान पडले होते......' असे वर्णन जयंत पवार यांच्या 'वरनभातलोन्चा नि. कोन नाय कोन्चा' या संग्रहातील कोणत्या कथेत आले आहे ?

(A) तुझीच सेवा काय करू जाणे

(B) सर निघाले सप्तपाताळाकडे

(C) बाबलच्या आयुष्यातील धादांत सत्य

(D) तर्काच्या खुंटीवरून निसटलेलं रहस्य

58. राजमाचीच्या घोड्यांवर/सर्वच सवाष्णी बसतात/ आपल्या त्यागाची बनारसी लुगडी वाळवीत—ह्या ओळी नामदेव ढसाळ यांच्या 'तुही यत्ता कंची' या संग्रहातील कोणत्या कवितेच्या प्रारंभी आल्या आहेत ?

(A) रमाबाई आंबेडकर

(B) कामाठीपुरा

(C) प्रियंकर

(D) जनरल वॉर्ड

59. 'कोण म्हणतं टक्का दिला' या नाटकात पौराणिक मिथकीय संकल्पनेचा वापर केला असून, सदर नाटकात शासकीय यंत्रणेतील आर्थिक भ्रष्टाचारावर कडाडून प्रहार केला आहे.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

60. लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला तर लोखंडाचे सोने होते. अशी नामदेवांबद्दलची भावना जनाबाईंनी कोणत्या अभंगात व्यक्त केली आहे ?

(A) नोवरीया संगें। वऱ्हाडीया सोहोळा

(B) दळितां कांडितां। तुज गार्दन अनंता

(C) कोणे एके दिवशीं। विठो गेला जनीपाशीं

(D) नामदेवा पुत्र झाला। विठो बारशासी आला

61. मानवी भाषा ही उपजत नसली, तरी भाषिक क्षमता मात्र उपजत असते.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



62. मौखिक वाङ्मयामध्ये पुढीलपैकी कोणते विशेष आढळतात ?

(*i*) छोटे छोटे लयबद्ध खंड

(*ii*) विशिष्ट टप्प्यावर पुनरावृत्त होणारे शब्दबंध

(*iii*) छोटे छोटे रचनाबंध

(*iv*) भाषादृष्ट्या व रचनादृष्ट्याच्या लक्षणीय वैविध्य

(A) (*i*) (*ii*) (*iii*)

(B) (*i*) (*iii*) (*iv*)

(C) (*ii*) (*iii*) (*iv*)

(D) (*i*) (*ii*) (*iv*)

63. साहित्याच्या भाषेमध्ये व्यवहारभाषेपेक्षा पुढीलपैकी कोणते निराळे विशेष असतात ?

(A) बव्हर्थकता, नित्यनूतनता, सौंदर्यपूर्णता

(B) वस्तुनिष्ठता, सौंदर्यपूर्णता, नित्यनूतनता

(C) वस्तुनिष्ठता, माध्यमरूपता, नित्यनूतनता

(D) साधनरूपता, वस्तुनिष्ठता, नित्यनूतनता

64. धातूंच्या पुढीलपैकी कोणत्या रूपांमध्ये साम्य असते ?

(A) मूळ व शक्य रूपे

(B) प्रयोजक व शक्य रूपे

(C) मूळ व प्रयोजक रूपे

(D) अकर्मक व प्रयोजक रूपे

65. व्याकरणकारांनी मराठी विभक्तींची संख्या निश्‍चित करताना विविध मते व्यक्त केली आहेत. ही संख्या पुढीलपैकी कोणत्या मर्यादेत दिसते ?

(A) तीन ते आठ

(B) दोन ते पाच

(C) दोन ते आठ

(D) पाच ते सात

66. उपमा, उत्प्रेक्षा, रूपक इ. अलंकार हे पुढीलपैकी कोणत्या वर्गातील अलंकार आहेत ?

(A) लोकन्यायमूल

(B) विरोधमूल

(C) सादृश्य प्रतीतिमूल

(D) तर्कन्यायमूल

67. भारतातील सर्वाधिक भाषांचे नाते कोणत्या भाषाकुलांशी जोडले जाते ?

(A) इंडोयुरोपियन व ऑस्ट्रिक

(B) ऑस्ट्रिक व सिनोतिबेटियन

(C) ऑस्ट्रिक व द्राविड

(D) इंडोयुरोपियन व द्राविड

68. 'स्वनिम' म्हणजे पुढीलपैकी काय नाही ?

(A) स्वनांतरांचा गट

(B) स्वनांचे प्रत्यक्षीकरण

(C) स्वनांबद्दलची अमूर्त संकल्पना

(D) विभेदक स्वनलक्षणांचा गट

69. संदेशनात्मक क्षमतेमध्ये व्याकरणिक व्यवस्थेचे ज्ञान गृहीत असते, मात्र अन्य कोणत्याही कौशल्याचा संदेशनात्मक क्षमतेत समावेश नसतो.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

70. प्रमाण बोली संबंधित प्रदेशातील सर्वच बोलींपासून सारख्याच अंतरावर असते, कारण तिच्यातील व अन्य बोलींमधील भेद हा भौगोलिक अंतराचा नसून व्यवहारक्षेत्राचा असतो.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

71. मुंबईत 1831 साली त्या वर्षाचे पंचांग शिळेवर कोणी छापले ?

(A) गणपत कृष्णाजी

(B) जावजी दादाजी

(C) राणोजी रावजी आरू

(D) गणपत सुंदरजी

72. मेजर कँडी यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या भाषांतरकार्याचा प्रारंभ कोणत्या संस्कृत नाटकाच्या भाषांतराने झाला ?

(A) अभिज्ञानशाकुंतल

(B) वेणीसंहार

(C) विक्रमोर्वशी

(D) प्रबोधचंद्रोदय

73. विज्ञानशाखा आणि वाङ्मयशाखा यांच्यामध्ये विरोध कल्पिला जातो, याच्यासारखी दुसरी गंभीर गफलत नाही, अशी परखड मांडणी कोणी केली आहे ?

(A) हरि केशवजी पाठारे

(B) ज. स. गाडगीळ

(C) का. बा. मराठे

(D) म. मो. कुंटे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



74. 'संस्कृत भाषेची विचिकित्सा' आणि 'प्राकृत भाषेची विचिकित्सा' हे निबंध कोणाचे आहेत ?

(A) नारायण भवानराव पावगी

(B) राजारामशास्त्री भागवत

(C) रामचंद्र भिकाजी जोशी

(D) बाळकृष्ण अनंत भिडे

75. 'राजमठाचे रहस्य' हा लेख कोणी लिहिला आहे ?

(A) इरावती कर्वे

(B) रा. चिं. ढेरे

(C) म. रा. जोशी

(D) धर्मानंद कोसंबी

76. पैशाची भाषेत 'बृहत्कथा' लिहिणारा गुणाढ्य हा लेखक कोणाच्या दरबारात होता ?

(A) वाकाटक

(B) चालुक्य

(C) मौर्य

(D) सातवाहन

77. दक्षिणेत शैव-वैष्णव संतांच्या कार्यामुळे हळूहळू बौद्धधर्माचा लोप होऊ लागला, परंतु वीरशैव पंथाच्या स्थापनेमुळे जैन धर्माचा प्रभाव मात्र कमी झाला नाही.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

78. शके 961 पूर्वीचा एकही मराठी ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे 'जोतिषरत्नमाले' वरील टीका हा मराठी भाषेतील आद्य ग्रंथ ठरतो, असे संशोधन कोणी मांडले आहे ?

(A) श्री. रं. कुलकर्णी

(B) वि. का. राजवाडे

(C) वि. भि. कोलते

(D) गं. दे. खानोलकर

79. 'काव्यरत्नावली' हे नियतकालिक प्रसिद्ध करणारे नारायण नरहर फडणीस यांची प्रेरणा कोणत्या नियतकालिकामागे होती ?

(A) साहित्यसूची

(B) कविता-रती

(C) अनुष्टुभ

(D) आमची श्रीवाणी

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



80. 'काळे पाणी' ही कादंबरी कोणत्या मासिकातून क्रमश: प्रकाशित झाली ?

(A) किर्लोस्कर

(B) मनोहर

(C) यशवंत

(D) रत्नाकर

81. 'भारतीय साहित्य' ही संकल्पना प्रथमत: कोणी उपयोजिली ?

(A) पाश्चात्य भारतविद्याशास्त्राच्या (Indologist) अभ्यासकांनी

(B) प्राच्य विद्याशास्त्राच्या अभ्यासकांनी

(C) मानववंशशास्त्राच्या संशोधकांनी

(D) मानसशास्त्रज्ञांनी

82. 'राष्ट्रीय साहित्य' म्हणजे काय ?

(A) राष्ट्र जरी बहुभाषिक असले तरी राष्ट्राचे आमतत्त्व ज्या साहित्यात उमटते ते 'राष्ट्रीय साहित्य' होय

(B) ज्या राष्ट्रात लोकतंत्र असते, त्याच राजनीतीचे प्रतिबिंब साहित्यनिर्मितीत उमटले की ते 'राष्ट्रीय साहित्य' होय

(C) ज्या राष्ट्रात आदर्श मूल्ये असतात, त्या आदर्श मूल्यांचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे 'राष्ट्रीय साहित्य' होय

(D) विश्वसाहित्याचे अनुकरण करणाऱ्या राष्ट्रातील साहित्यनिर्मितीला 'राष्ट्रीय साहित्य' असे म्हणतात

83. 'अनुवाद' ही एक व्यापक संज्ञा असून 'भाषान्तर' ही 'अनुवादा'त सामावून जाणारी संज्ञा नव्हे.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

84. कालिदास विरचित 'मेघदूत' ची मराठी भाषान्तरे कोणी केली ?

(1) वा. वि. मिराशी, बा. भ. बोरकर, रा. शं. वाळिंबे

(2) वामन कृष्ण परांजपे, वा. रा. नेरुळकर, दत्तात्रेय वेङ्कटेश केतकर

(3) शान्ता शेळके, पण्डित ग. नी. कात्रे, दत्तात्रेय वेङ्कटेश केतकर

(4) चिन्तामणराव देशमुख, बा. भ. बोरकर, अ. ज. विद्वांस

(A) 3 आणि 4

(B) 1 आणि 2

(C) 2 आणि 3

(D) 1 आणि 4

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



85. भारतीय सत्व हा संवेदनशीलतेचा स्वाभाविक गाभा असला तरी अन्य संस्कृतींची संवेदनशीलता उसनी घेता येत नाही.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

86. वि. स. खांडेकरांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांच्या वाचनानंतर त्यांचे मराठी कादंबरीकारांनी विशेषत्वाने अनुकरण केले नसले तरी गुजराती एवं तमीळ कादंबरीकारांनी त्यांचा स्वीकार केला होता, असे म्हणताना वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्यांची वर्गवारी कोणत्याप्रकारे करता येईल ?

(A) भाषान्तर

(B) रूपान्तर

(C) अनुकरण

(D) प्रभव

87. तौलनिक साहित्याभ्यासाशी संबंधित ग्रंथ आणि त्यांस संबंधित असलेले संपादक/लेखक यांच्या सार्थक जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (*a*) तौलनिक साहित्याभ्यास: तत्त्व आणि दिशा | (1) निशिकान्त मिरजकर |
| (*b*) तौलनिक साहित्याभ्यास | (2) आनन्द पाटील |
| (*c*) तौलनिक साहित्य : नवे सिद्धान्त आणि उपयोजन | (3) वसन्त बापट |
| (*d*) तौलनिक साहित्य | (4) चन्द्रशेखर जहागीरदार |
| | (5) सुधीर रसाळ |

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (2) | (1) |
| (B) | (1) | (2) | (3) | (4) |
| (C) | (2) | (3) | (4) | (1) |
| (D) | (3) | (4) | (1) | (2) |

www.prepp.in



88. एका साहित्य कृतीतील अर्थाला शक्य तितकी सममूल्यके (equivalences) ठरतील असा अर्थसंभार अन्य साहित्यकृतींत ग्रथितकरणे ही कृती कोणत्या प्रकारच्या अभ्यासास अभिप्रेत आहे ?

(A) स्वनान्तर

(B) अर्थान्तर

(C) ध्वन्यान्तर

(D) भाषान्तर

89. पूर्वपरंपरेशी निश्चित स्वरूपाचे नाते दर्शविणाऱ्या बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेत कोणते मराठी काव्यरचनाप्रकार आढळतात ?

(A) अभंग आणि सुनीत

(B) अभंग आणि ओवी

(C) सुनीत आणि मुक्त कविता

(D) हायकू आणि रुबाई

90. लण्डनमधील स्कूल ऑव्ह ओरिएण्टल ॲण्ड आफ्रिकन स्टडिजमध्ये अध्यापन करीत असताना मराठीतील साहित्यकृतींची इंग्रजी भाषान्तरे करणारी व्यक्ती कोण ?

(A) क्लाडिओ गुलियन

(B) इॲन रेसाइड

(C) एस. एस. प्रावर

(D) ए. आर. तोरो

91. 'तीन दगडाची चूल' हे आत्मकथन कोणाचे ?

(A) विमल मोरे

(B) नजुबाई गावित

(C) शांताबाई कांबळे

(D) बेबी कांबळे

92. 'झिम पोरी झिम' ही कादंबरी कोणाची आहे ?

(A) दासू वैद्य

(B) भास्कर चंदनशीव

(C) बालाजी इंगळे

(D) जगदीश कदम

93. वामन होवाळ यांनी कथालेखनाबरोबरच लोकनाट्यदेखील लिहिले आहेत.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

94. 'हाणला कोयता, झालो मास्तर' हे आत्मकथन कोणाचे आहे ?
    (A) सुभाष शेकडे
    (B) शरणकुमार लिंबाळे
    (C) बाबूराव गायकवाड
    (D) भीमराव गस्वी

95. 'राघववेळ' ही कादंबरी कोणाची ?
    (A) वासुदेव मुलाटे
    (B) रणजित देसाई
    (C) नामदेव कांबळे
    (D) भीमराव वाघचौरे

96. '72 मैल' ह्या कलाकृतीचे लेखक कोण ?
    (A) महावीर जोंधळे
    (B) वामन होवाळ
    (C) भारत सासणे
    (D) अशोक व्हटकर

97. 'वाङ्मयशारदेचे नूपुर' हा ग्रंथ कोणचा ?
    (A) साने गुरुजी
    (B) कमलाबाई देशपांडे
    (C) सरोजिनी बाबर
    (D) मालतीबाई दांडेकर

98. 'माच' हा लोकनाट्यप्रकार भारताच्या कोणत्या राज्यात रूढ आहे ?
    (A) ओरिसा
    (B) मध्यप्रदेश
    (C) आंध्रप्रदेश
    (D) कर्नाटक

99. प्रबोधनात्मक शाहिरी रचणाऱ्या कोणत्या शाहिरास म. जोतीराव फुले यांचा सहवास लाभलेला होता ?
    (A) कालिचरण नंदगवळी
    (B) किसन फागू बनसोडे
    (C) शिवराम जानबा कांबळे
    (D) गोपाळबाबा वलंगकर

100. 'ओवी ते लावणी' हे पुस्तक कोणी लिहिले आहे ?
    (A) श्री. रं. कुलकर्णी
    (B) वि. कृ. जोशी
    (C) म. ना. सहस्त्रबुद्धे
    (D) म. वा. धोंड

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



## ROUGH WORK

Prepp Your Personal Exam Guide